**जागतिक महिला दिन**

**दिनांक ८  मार्च २०२१**

**एक दिवसीय वेबिनार अहवाल**

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती महिला सबलीकरण समिती आणि समाजशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ८  मार्च २०२१ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त एक दिवसीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या वेबिनारसाठी मार्गदर्शक म्हणून मॉडन कला, वाणिज्य आणि  विज्ञान महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख आणि सहाय्यक प्राध्यापक डॉ. साधना नातू या मार्गदर्शक म्हणून लाभल्या होत्या. त्यांनी उपस्थित श्रोत्यांना 'स्त्रिया आणि मानसिक आरोग्य' या विषयावर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी ऑनलाइन जवळपास १०० विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. साधना नातू यांनी मार्गदर्शन करत असताना प्रामुख्याने महिला आणि त्यांचे मानसिक प्रश्न, कौटुंबिक हिंसाचार, कामाच्या ठिकाणी होणारा छळ, अन्याय-अत्याचार, बदलत्या जीवनशैलीमुळे निर्माण होणारे ताण तणाव यांचे व्यवस्थापन कसे करावे याविषयी सखोल मार्गदर्शन केले. याबरोबरच डॉ. साधना नातू यांनी समकालीन परिस्थितीमध्ये उद्‌भवलेल्या कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर लॉकडाउनच्या परिस्थितीमध्ये स्त्रियांना आणि एकूणच सर्व समाजाला कोणत्या ताणतणावांना सामोरे जावे लागत आहे यावरही भाष्य केले. तसेच त्यांनी या लॉकडाउनच्या कालावधीमध्ये कष्टकरी, घरगुती महिला कामगार यांना नेमक्या कोणत्या प्रकारच्या अडचणींना, मानसिक ताणतणावांना सामोरे जावे लागले याविषयी देखील भाष्य केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉक्टर चंद्रशेखर मुरूमकर सर, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार माननीय अभिनंदन शहा सर, महाविद्यालयाचे सर्व उपप्राचार्य यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. उपप्राचार्य डॉ. सीमा नाईक गोसावी या होत्या. तर या कार्यक्रमाचे स्वागत प्रास्ताविक डॉ. व्ही. सी. काकडे  यांनी केले. या कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून लाभलेल्या वक्त्यांचा परिचय समाजशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. विनायक लष्कर सर  यांनी केले. या कार्यक्रमामध्ये सूत्रसंचालनाची जबाबदारी माननीय डॉ. भगवान माळी  यांनी पार पाडली. याबरोबरच दुरदृश्य प्रणालीद्वारे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता  या दूरदृश्य प्रणालीची नियोजनाची तांत्रिक

व्यवस्था प्राध्यापक राहुल शहा सर यांनी पार पाडली. या संपूर्ण कार्यक्रमाचे आभार मा. सुषमा संगई यांनी केले.

